## <u>नि.फौ.खटला क्र. ३२३/२०२३ मधील नि.क्र.४८ खालील आदेश</u>

CNR–MHBI060025992023

आरोपी क्रं. ४ ते ६ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३९ अन्वये त्यांना सदर प्रकरणातुन वगळण्यात यावे यासाठी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत आरोपी यांचे थोडक्यात कथन असे की, तक्रारदार व आरोपी क्र. १ ते ३ हे एकाच गावातील आहेत व आरोपी क्र. २ व ४ ते ७ हे सरकारी कर्मचारी आहेत. तक्रार यांनी सदर आरोपींविरूध्द केलेली तक्रार ही बनावट व राजकीय वैमनस्यातुन आरोपींकडून पैसे उकळण्यासाठी केलेली आहे. अंबाजोगाई शहर पोलीस ठाणे येथे दाखल केलेल्या अहवालात आरोपी क्र. १ ते ३ व ७ यांनी प्रथमदर्शनी गुन्हा केला आहे. त्यामुळे सदर गुन्हयात आरोपी क्र. ४ ते ६ यांचा कोणताही सहभाग नाही. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार सदर घटना १३.०१.२०१६ रोजी घडली आहे व सदर तक्रार आरपीएडी द्वारे दिनांक ०२.०५.२०१६ रोजी पोलीस अधिक्षक बीड यांना पाठवलेली आहे व त्यानंतर दिनांक २९.०६.२०१६ रोजी सदर तक्रार संबंधीत पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे सदर तक्रार दाखल करण्यास विलंब झाल्याचे तक्रारदार यांनी स्पष्टीकरण दिलेले नाही. त्यामुळे आरोपी क्र. ४ ते ६ यांच्याविरूध्द केलेले आरोप निराधार असल्यामुळे त्यांना सदर प्रकरणातुन वगळण्यात यावे. आरोपी क्र. २ ते ४ यांच्या विरूध्द लावलेले आरोप सिध्द करण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. त्यामुळे आरोपी क्र. ४ ते ६ यांना सदर गुन्हयातुन मुक्त करण्यात यावे.

३. फिर्यादीने सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही, त्यामुळे त्यांच्याविरूध्द सदर अर्ज विना म्हणणे चालवण्यात येत आहे.

४. फिर्यादीने प्रस्तुतचे प्रकरण आरोपींविरूध्द भारतीय दंड विधान कलम ४२०, ४०९, ४६७, ४६८, ४७१ सह कलम ३४ अन्वये दाखल केलेला आहे. सदर प्रकरणामधील आरोपी क्र. १ ते ३ हे एकाच गावातील आहेत व आरोपी क्र. २ व ४ ते ७ हे सरकारी कर्मचारी आहेत. तक्रार यांनी सदर आरोपींविरूध्द केलेली तक्रार ही बनावट व राजकीय वैमनस्यातुन आरोपींकडून पैसे उकळण्यासाठी केलेली आहे. अंबाजोगाई शहर पोलीस ठाणे येथे दाखल केलेल्या अहवालात आरोपी क्र. १ ते ३ व ७ यांनी प्रथमदर्शनी गुन्हा केला आहे. त्यामुळे सदर गुन्हयात आरोपी क्र. ४ ते ६ यांचा कोणताही सहभाग नाही. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार सदर घटना १३.०१.२०१६ रोजी घडली आहे व सदर तक्रार आरपीएडी द्वारे दिनांक ०२.०५.२०१६ रोजी पोलीस अधिक्षक बीड यांना पाठवलेली आहे व त्यानंतर दिनांक २९.०६.२०१६ रोजी सदर तक्रार संबंधीत पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे सदर तक्रार दाखल करण्यास विलंब झाल्याचे तक्रारदार यांनी स्पष्टीकरण दिलेले नाही. त्यामुळे आरोपी क्र. ४ ते ६ यांच्याविरूध्द केलेले आरोप निराधार असल्यामुळे त्यांना सदर प्रकरणातुन वगळण्यात यावे अशी विनंती केली आहे.

५. सदर अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३९ प्रमाणे दाखल करण्यात आलेला आहे. आरोपीने उपस्थीत केलेल्या कारणाबाबत फिर्यादीने

आरोपीविरूध्द वाईट हेतुने तक्रार दाखल केली आहे की नाही हे शोधण्यासाठी आरोपीने खटला चालवणे आवश्यक आहे. या टप्यावर आरोपीला सदर प्रकरणातुन वगळण्यासाठी अभिलेखावर काहीही नाही हे देखील लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, साक्षीदारांच्या विश्वासहर्तेवर शंका घेण्याबाबत इतर सर्व कारणे ऐकीव पुरावे संबंधीत साक्षीदारांचे जबाब नोंदवल्यानंतरच ठरवता येतात आणि त्यासाठी आरोपीविरूध्द खटला चालवणे आवश्यक आहे. आरोपीला दोषमुक्त करण्यासाठी अर्जात नमुद केलेली कारण समाधानकारक नाहीत, या सर्व कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज नामंजुर होणस पात्र आहे. सबब मी पुढील प्रमाणे आदेश करतो.

**आदेश**

१. अर्ज नि. क्रं. ४८ नामंजुर करण्यात येतो.

२. मुळ अर्जाचे खर्चाबाबतचा आदेश अर्जाच्या अंतिम सुनावणीवेळी पारीत करण्यात येईल.

सही/-

दिनांकः- २०/०९/२०२५.

**(ए.एम.ढवळे )**

न्यायदंडाधीकारी, प्र.वर्ग, (कोर्ट क्र. ३ )

अंबाजोगाई.